ISSN 2231-5063 Impact Factor : 4.6052(UIF) Volume - 6 | Issue - 4 | October - 2016

GRT Golden Research Thoughts

'दारिद्रय भारतीय राजकारणासमोरील एक आव्हान'

प्रा. डॉ. विमल राठोड

राज्यशास्त्र विभाग , पी. डब्लू एस. कला व वाणिज्य महाविद्यालय, कामठी रोड,नागपूर.

सारांश

भारतात आपल्याला विविधतेत एकता दिसून येते. भारतात अनेक समस्या असून या समस्येमुळे अनेक बदल राजकीय प्रकियेत घडून आले आहे. त्या समस्या आजवत सोडविल्या गेलेलया नाहीत. त्यामुळे त्या भारतीय राजकारणासमोरील एक आव्हान ठरले आहे.

खरी लोकशाही यशस्वी होण्यासाठी सामाजिक आणि आर्थिक न्याय प्रस्थापित होणे आवश्यक आहे. भारतात आर्थिक विषमता फार मोठया प्रमाणात आहे. त्यामुळे दारिद्रतेत वाढ होत आहे.

भारत कृषीप्रधान देश आहे. शेती पूर्णपणे पावसावर आधारित आहे. पाऊस आला नाही तर शेतक–यांचे फार नुकसान होते व त्यामुळे दारिद्रयेत वाढ होते. उत्पादनाचे विषम वाटप झाल्यामुळे श्रीमंत अधिक श्रीमंत आणि गरीब अधिक गरीब होतांना दिसत आहे. लोक प्रलोभनाला बळ पडून योग्य प्रतिनिधीची निवड करीत नाही. त्यामुळे भ्रष्टाचारात वाढ होत आहे. लोकसंख्या वाढत आहे. त्या तुलनेत उत्पादन वाढत नाही. त्यामुळे दारिद्रयतेत भर पडत आहे. त्यामुळे लोक चोरी, दरोडे, खुन इत्यादी वाईट मार्गाकडे वळले आहे.

दारिद्रयांची समस्या ज्वलंत समस्या असून त्याचे निर्मूलन करण्याकरीता शासनाने विविध योजना आणि उपाय सांगितलेले आहे. त्याकरीता नियोजन आयोगाच्या माध्यमातून विविध पंचवार्षिक योजना सुरू करण्यात आलेल्या आहेत. ग्रामिण विकास कार्यकम, राष्ट्रीय ग्रामिण दुक्क स्वयंरोजगार योजना ग्रामिण रोजगार योजना, जवाहर रोजगार योजना, रोजगार हमी योजना इत्यादी राबविल्या जात आहे. या समस्याचे मुळ कारण वाढती लोकसंख्या असल्यामुळे 'ासनाने लोकसंख्येवर नियंत्रण इेवण्यासाइी कडक धोरण आखले पाहिजे. त्याची अमलबंजावणी केली पाहिजे.

KEY WORDS : दारिद्रय , राजकारण, समस्या कारण, परिणाम लोकशाही.

प्रस्ताविक:

भारतात विविध जातीचे, धर्माचे, ग्रंथाचे, संस्कृतीचे भाषेचे लोक राहतात. तरी देखील विविधतेत एकता आपल्याला दिसून येते. या विविधतेने भारतीय राजकारणावर, मोठया प्रमाणात प्रभावर टाकला आहे. या समस्येमुळे अनेक बदल राजकीय प्रकियेत घडून आले आहे. तरी

देखील या समस्या आजवत, सोडविल्या गेलेल्या नाहीत. त्या भारतीय राजकारणासमोरील आव्हान ठरले आहे.

राजकीय स्वातंत्र्य प्राप्त झाल्याने खरी लोकशाही प्रस्थापीत होवू शकत नाही. सामाजिक व आर्थिक न्याय प्रस्थापित, झाल्यावरच खरी राजकीय लोकशाही प्रस्थापित होवू शकते. आर्थिक विषमता भारतात फार मोठया प्रमाणात आहे. त्यामुळे लोकशाहीच्या यशस्वीतेमध्ये बाधा येत आहे. दहशतवाद, दाद्रिदय, जातीयवाद, धर्मवाद, भाषावाद अशा समस्यांचे प्रमाण वाढत चालले आहे.

भारत हा कृषीप्रधान देश आहे. सुमारे 65 प्रतिशत लोक शेती व्यवसाय करतात. उत्पादनाची अद्यावत साधने ग्रामीण भागातील जनतेला अजूनही माहिती नाही. शेती हा पूर्णपणे पावसावर आधारित असलेला व्यवसाय आहे. त्यामुळे योग्यवेळी पाऊस आला नही तर शेतक–याचे फार नुकसान होते. परिणामतः ग्रामीण भागात दारिद्रयाचे प्रमाण जास्त आहे परपरांगत साधने, पावसाचा लहरीपणा, पाण्याचे नियोजन नसणे, शासनाचे कृषीविषयक धोरण, सावकारी व्यवस्था, दलाल, शिक्षणाचे कमी प्रामण, अंधश्रद्धा या सारख्या अनेक कारणामुळे दारिद्रयेत वाढ होतांना दिसून येत आहे.

भारतीय राजकर्ते आणि लोकप्रतिनिधी भ्रष्टाचारी असल्यामुळे दारिद्रयतेत कधी पाच वर्ष पूर्ण होण्यापूर्वी मध्यवर्ती खर्च होतो. तो पैसा कराच्या रूपाने जनतेकडून वसूल केला जातो. त्यातून महागाई, बेकारी, रोजगाराचा अभाव, विविध कर भरणे इत्यादी कारणामुंळे व्यक्तीसमोर दारिद्रयाची परिस्थिती निर्माण होते. उत्पादनाचे विषय वाटप झालेले आहे. त्यामुळे श्रीमंत अधिक श्रीमंत आणि गरीब अधिक गरिब होतांना दिसून येत आहे. उत्पादनाचे विषय वाटप, बेकारी, संसाधनाचा अभाव, योग्य नियोजनाची उणीव, ग्रामीण क्षेत्रात पतसंस्थाचा अभाव, मूलभूत उद्योग, वितरणातील असमानता बेरोजगारी इत्यादी कारणांमुळे भारतातील 50 प्रतिशत जनता दारिद्रतेत जीवन जगत आहे. त्यामुळे जिवनातील ख–या आनंदाचा उपभोग ते घेवू शकत नाही. आपल्या अधिकाराचा उपभोग ते घेवू शकत नाही. अनेक प्रलोभनाला बळी पडून ते मतदान करतांना दिसते. त्यामुळे योग्य प्रतिनिधीची निवड केल्या जात नाही. त्यामुळे निकोप लोकशाही यशस्वी होवू शकत नाही.

'मात्थस' या विचारवंताने लोकसंख्या आणि अन्नधान्य यांचा परस्पर संबंध स्पष्ट केला. लोकसंख्येच्या तुलनेत अन्नधान्यात वाढ न झाल्यामुळे उपासमारीची वेळ येते. वाढत्या लोकसंख्येमुळे प्रती व्यक्ती उत्पन्न देखील वाढत नाही. जीवघेण्या गरीबीमुळे अनेक भारीतय मूलभूत अधिकारापासनू वंचित राहतात. भारतात जाती ही व्यवस्था होती त्यामुळे काही समाजातील लोकांना अर्थाजन करण्याचे अधिकारच देण्यात आले नव्हते. त्यामुहे समाजातील बहुसंख्य लोक आर्थिक क्षेत्रापासून वंचित राहिले. त्याचा आर्थिक विकास होवू शकला नाही. भारतीय समाजात निरक्षरतेचे प्रमाण जास्त आहे. त्याचा परिणाम आर्थिक व्यवस्थेवर होतो दारिद्रय ही मानवाच्या गरजांची निगडीत समस्या आहे. त्यामुळे व्यक्तीच्या जीवनावर खालील दुष्परिणाम होतात.

दारिद्रयात जीवन जगणा–या माणसाला चांगले घ्ज्ञर, भोजन, शिक्षण उपलब्ध होत नाही. त्यांचे शरीर अधिकाधिक दुर्बल होत जाते. त्यामुळे मृत्युचे प्रमाण वाढते दारिद्रयात जीवन जगणा–या व्यक्तीला आपली परिस्थिती सुधारावी असे वाटते. आणि संपत्तीमधील विषमता कमी करण्याच्या दृष्टीने कायदे करायला पाहिजे दारिद्रयाच्या परिस्थितीत असलेल्या लोकांना विविध लाभ मिळवून द्यावे जेणे करून त्यांची परिस्थिती मदत होईल.

सर्व समस्यांचे मुळ कारण वाढती लोकसंख्या आहे. लोकसंख्या वाढली. पण उत्पादन वाढले नाही. तर उपासमारीची वेळे येते. लोकसंख्या वाढते पण उत्पन्न मात्र वाढत नाही. त्यामुळे दारिद्रयतेत वाढ होते. म्हणून शासनाने लोकसंख्येवर नियंत्रण ठेवण्यासाठी कडक धोरण आखले पाहिजे. त्याची अमलबजावणी केली पाहिजे दारिद्रयाचे निर्मुलन करण्यासाठी ज्या योजना राबविल्या आहेत. त्या लोकांपर्यंत ग्रमपंचायतीच्या माध्यमतून गेल्या पाहिजे. जेणे करून गरजू व गरिब लोकांना त्याचा फायदा होईल. अशा प्रकारे विविध उपाययोजनांचा माध्यमातून दारिद्रयतेचे निर्मुलन करता येईल.

निष्कर्षः

1. दारिद्रय लोकशाहीच्या यशस्वीतेत अडथळा ठरत आहे.
2. दारिद्रयतेमुळे देशाचा विकास होत नाही.
3. नेत्याच्या अवाजवी हस्तक्षेप कायद्याची अयोग्य अमलबजावणी त्यामुळे दारिद्रयतेच्या प्रमाणात वाढ होत आहे.
4. पावसावर आधारित शेती आधुनिक अवजारांविषयी ज्ञान नसणे, शिक्षणांचे कमी प्रमाण त्यामुळे दारिद्रय निर्मुलन होत नाही.
5. प्रत्येक भारतीय नागरीक आपले अधिकार आणि कर्तव्याप्रती जागृत झाले पाहिजे तेव्हाच. दारिद्रयाचे निर्मुलन होवू शकते.

संदर्भ ग्रंथः

1. भारतीय शासन आणि राजकारणः डॉ. अशोक काळे, प्रा. सुनिल अडगांवकर
2. भारतीय शासन आणि राजकारणः डॉ. अलका देशमुख
3. भारतीय शासन आणि राजकारणः डॉ जोगेद्र गवई